# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१०६७

**अपिलार्थी श्री. विजय सांगा शियाळ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून सक्षम प्राधिकारी-२, (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नायब तहसिलदार सक्षम प्राधिकारी-२ (टे-४)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.
रूम क्र..३०२, ३ रा मजला, ए-विंग, प्रशासकीय इमारत,
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०८.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२३ | १७.११.२०२३/१४.०३.२०२४ | २६.१२.२०२३ | ०२.०२.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०४.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती देण्यात आलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.११.२०२३, १४.०३.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०२.०२.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १७.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार सक्षम प्राधिकारी- २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयातील कंत्राटी सेवानिवृत्त अव्वल कारकून तथा जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधीत १० मुद्यांची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.११.२०२३ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपण मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याने महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१२/९८९/ प्र.क्र. ४७९/सहा दि. १७.१०.२०१४ अन्वये कर्मचारी/ अधिकारी यांची वैयक्तिक, सेवेची व आर्थिक स्वरुपाची माहिती देता येत नाही. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २६.१२.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०२.२०२४ रोजी अर्जदार यांचे अपील अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस पुरविण्यात

..२/-

यावी असे आदेशित केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.०३.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, या कार्यालयाचे उपलब्ध अभिलेखामध्ये आपण मागणी केलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेतला असता मागणी केलेली माहिती आढळून येत नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती पुरविता येत नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीला त्यांनी मागितलेली माहिती सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक दि. १७.१०.२०१४ प्रमाणे देता येत नाही असे कळविले व नंतर माहिती अभिलेखात आढळून येत नाही असे कळविले. दोन्हीही उत्तरात विसंगती आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश चुकीचे आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक दि. १७.१०.२०१४ प्रमाणे अपिलार्थींना माहिती नाकारली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्यांचे माहिती अर्जात नमुद मुद्दा क्र. १ अन्वये संबंधीत नियुक्ती आदेशाची प्रत अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : १३.०८.२०२५**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

13-8-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**